13-14 - ①

# ॲन्टि रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात सन 2013-14 ची सभा 6.7.2013 शनिवार रोजी भरली. ॲन्टी रॅगींग समितीची सभा प्राचार्य कक्षात संपन्न झाली.

सभेपुढील विषय

1) नविन विद्यार्थीनींना रॅगींग विषयी माहिती देणे
2) रॅगींग समितीचा बोर्ड लावण्यात आला आहे याची माहिती देणे.

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते

1) डॉ अश्विनीकुमार भारद्वाज   प्राचार्य
2) डॉ दिपा ठोळकर   नोडल अधिकारी
3) प्रॉ. मिनल बर्वे   सदस्य

सभेच्या सुरुवातीस डॉ ठोळकर दिपा यांनी सभेपुढे मागील सभेचे इतिवृत्त सादर केले. सभेने इतिवृत्तास मंजूरी दिली.

आपल्या कॉलेजमध्ये आजपर्यन्त कधिही कोणत्याही स्वरुपाचे रॅगींग झालेले नाही हि समाधानकारक बाब असल्याचे डॉ. भारद्वाज सरांनी सांगितले.

यावर्षी प्राचार्य जेव्हा नविन विद्यार्थीनींना कॉलेज संदर्भातील माहिती देतात त्याच वेळी रॅगींग कमिटीच्या नोडल अधिकाऱ्याने [ डॉ. दिपा ठोळकर ] रॅगींग विषयी माहिती दयावी असे ठरले. ॲन्टी रॅगींग विषयी U.G.C ने दिलेल्या नियमा प्रमाणे विद्यार्थीनींचे फॉर्म [ ॲफिडेव्हिट ] भरुन घेतले जाते ना? या विषयी कमिटीने माहिती घ्यावी.

दरवर्षी विद्यार्थी कल्याणमंडळाचा फॉर्म भरतांना ॲन्टी रॅगींगचा फॉर्म भरल्याची नोंद असावी लागते त्याकडे नोडल अधिकाऱ्याने लक्ष दयावे असे सुचविण्यात आले.

विद्यार्थीनींना रॅगींग विषयी सरवोल कायदेशीर माहिती

मिळावी यासाठी लॉ कॉलेजमधील वकिलांशी संपर्क साधून त्यांना आपल्याकडे निमंत्रित करावे असे ठरविण्यात आले.
नविन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनींना ॲन्टी रॅगींग कमिटीचा बोर्ड कॉलेजच्या प्रवेशद्वाराजवळच लावल्याची माहिती द्यावी व त्यावर प्राचार्य, नोडल अधिकारी यांचे मोबाईल नंबर नमुद केल्याची सूचना द्यावी असे ठरले.
सभेच्या शेवटी प्रा. मिनल बर्वे यांनी आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने मिटिंग संपल्याचे सांगितले

समिती प्रमुख
डॉ. डी. के. होळकर

प्राचार्य
डॉ. वृ. आर. भारद्वाज

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya,
Jail Road, Nasik Road-422 101

Date
Page 13-14 2

ॲन्टि रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात सन 6.3.2014 गुरुवार रोजी भरती ॲन्टी रॅगींग समितीची सभा प्राचार्य कक्षात संपन्न झाली.

सभेपुढील विषय.

1) ॲन्टी रॅगींग समितीचा अहवाल.
2) ऐनवेळी येणारा विषय.

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते.

1) डॉ. अश्विनीकुमार भारद्वाज — प्राचार्य
2) डॉ. दिपा होळकर — नोडल अधिकारी
3) डॉ. मिनल बर्वे — सदस्य

वर्षाच्या शेवटी झालेल्या या मिटिंग मध्ये मा. डॉ. दिपा होळकर यांनी या समितीचा अहवाल सादर केला. या समितीने 4 वेळा अचानक भेटी दिल्या असता विद्यार्थीनी कक्ष, गोसावी हॉल, स्पोर्टस रुम, कॉलेज कॅम्पस इ. कुठेही कोणताही रॅगींगचा प्रकार झालेला नाही असे दिसून आले म्हणजेच आपले कॉलेज 'रॅगींग होतच नाही' अशा स्वरुपाचे आहे अशी माहिती दिली.

पुणे विद्यापिठास वर्षातून दोन वेळा ॲन्टी रॅगींगचा अहवाल पाठवावयाचा असतो ते काम पूर्ण केलेले आहे अशी माहिती मा. मिनल बर्वे यांनी सभेस दिली आणि त्याच्या हार्ड कॉपी विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकाऱ्याकडे सुपूर्त केल्याचे सांगितले.

आपल्या कॉलेजमध्ये कधिही रॅगींगचा प्रकार होत नाही हि बाब आपल्यासाठी समाधानकारकच आहे परंतु जर विद्यार्थीनींना बाहेरच्या विद्यार्थ्यांकडून किंवा इतर व्यक्तींकडुन जर त्रास होत असेल तर त्यांनी शिक्षकांना सांगावे आणि तशी तक्रार शिक्षकांकडे

Date
Page

आल्यास त्यांनी त्वरित प्राचार्यांना सांगावे अशी सूचना मा. प्राचार्य अश्विनीकुमार भारद्वाज यांनी केली.

प्रा. मिनल बर्वे यांनी सर्वांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

समिती प्रमुख
डॉ. डी. के. ठोकळ

प्राचार्य
डॉ. ए. आर. भारद्वाज
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshm
Arts & Commerce Mahila Mahavidyala
Jail Road, Nasik Road-422 101

# अॅन्टी रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात सन 2014-15 ची सभा दि 14-7-2014 रोजी भरली. अॅन्टी रॅगींग समिती सभा प्राचार्य कक्षात संपन्न झाली.

सभे पुढील विषय

1> विद्यार्थीनीना अॅफीडेव्हिट करतांना येणाऱ्या अडचणी पाहणे.
2> नविन विद्यार्थीनीना रॅगींग विषयी माहिती देणे
3>. प्रथम सत्रात युनिव्हरसिटीला रिपोर्ट पाठविणे

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते

1> डॉ. अश्विनीकुमार भारद्वाज प्राचार्य
2> डॉ. दिपा होळकर नोडल अधिकारी
3> प्रॉ. मिनल बवे .

UGC व युनिव्हरसिटीच्या नियमानुसार विद्यार्थीनींना रॅगींग करणार नाही या विषयी शपथेवर दिलेली लेखी जबानी [ अॅफीडेव्हिट ] करून द्यावे लागते. त्यासाठी 20 रु चा स्टॅम्प लागतो परंतु बाजारात 20 रु. चा स्टम्प उपलब्ध नसल्याने 100 रु च्या स्टम्पवर ते टाईप करून द्यावे लागते शिवाय टाइपिंगचेही पैसे विद्यार्थीनीला द्यावे लागतात असा मुद्दा प्रा होळकर यांनी उपस्थित केला व त्यावर काही उपाय करता येईल का ? असे सुचविले.

मा. भारद्वाज सर यांनी आपण इतर कॉलेजमध्ये चौकशी करू आणि त्यातील अडचणी कशा सोडविता येतील ते पाहू असे आश्वासन दिले.

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही नविन विद्यार्थीनींना रॅगींग विषयी नोडल अधिकाऱ्याने वर्गात जाऊन माहिती द्यावी असे प्राचार्यांनी सांगितले.

दरवर्षी दोन वेळा अॅन्टी रॅगींगचा ऑनलाईन रिपोर्ट पाठवावा लागतो तो लवकरात लवकर पाठवावा म्हणजे एका कामाची पूर्तता झाली असे होईल अशी सूचना मा.

Date
Page

प्राचार्य डॉ. भारद्वाज यांनी केली.
कौन्सलिंगचा विद्यार्थिनींच्या वर्तनात फरक पडतो त्यामुळे नियमितपणे विद्यार्थिनींना कौन्सलिंग सेंटरची माहिती द्यावी अशी सूचना डॉ. बर्वे यांनी केली.
डॉ. होळकर यांनी सर्वांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

(signature)
समिती प्रमुख
डॉ. डी. के. होळकर

(signature) 14/7/24
प्राचार्य
डॉ. यु. आर. भारद्वाज
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya,
Jail Road, Nasik Road-422 101

Date
Page 14-15

## ॲन्टी रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात ॲन्टी रॅगींगची सभा दि 28-2-2015 रोजी मा. प्राचार्यांच्या कक्षात संपन्न झाली.

सभेपुढील विषय

1) वर्षभर केलेल्या कामकाजाचा आढावा घेणे.
2) विद्यार्थीनींना ॲफिडेव्हिट करतांना येणाऱ्या अडचणींवर उपाय करणे

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते

1) डॉ अश्विनीकुमार भारद्वाज प्राचार्य
2) डॉ. ढोक्कर दिपा नोडल अधिकारी
3) डॉ. बर्वे मिनल सदस्य
4)
5)

वर्षभरात कमिटीने 4 वेळा वेगवेगळ्या ठिकाणी अचानक भेटी देऊन कुठे रॅगींग होते आहे का ? याविषयी पाहणी केली असता कुठेही रॅगींगचा कोणताही प्रकार आढळला नाही तसेच वर्षभरात कुणाकडून ही कशा स्वरूपाची तक्रार आली नाही अशी माहिती सभेला डॉ ढोक्कर यांनी दिली.

विद्यार्थीनींना ॲफिडेव्हिट करण्यासाठी काही मजकूर टाईप करून घ्यावा लागतो त्याचे टाईपिंगसाठी अधिक पैसे दिले जातात त्या ऐवजी आपण जर फॉर्मेट मध्ये छापलेला अर्ज छापूनच ठेवला तर विद्यार्थीनींना कमी पैशात हे काम करणे शक्य होईल असा विचार मा. बर्वे मिनल यांनी मांडला व प्राचार्यांनी तसे करण्यास परवानगी द्यावी [ कायदेशीर बाबी लक्षात घेऊन ] अशी विनंती करण्यात आली.

आजपर्यंत रॅगिंगचा कोणताही गैरप्रकार घडलेला नाही याबाबत सदस्यांचे प्राचार्यांनी अभिनंदन केले व डॉ. ढोक्कर यांनी सर्वांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

समिती प्रमुख
डॉ ढोक्कर

प्राचार्य
डॉ. ए. आर. भारद्वाज

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya,
Jail Road, Nasik Road-422 101

15-16

ॲन्टी रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात सन २०१५-१६ ची सभा 12.8.2015 रोजी प्राचार्य कक्षात घेण्यात आली

सभेपुढील विषय

1) विद्यार्थीनींकडून स्टॅम्पपेपरवरच ॲफिडेव्हिट करून घेणे
2) F.Y.B.A. व F.Y.B.Com च्या विद्यार्थीनींना रॅगींग विषयी माहिती देणे

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते

| | | |
|---|---|---|
| 1) | डॉ.अश्विनीकुमार भारद्वाज | प्राचार्य |
| 2) | डॉ. दिपा ढोळकर | नोडल अधिकारी |
| 3) | प्रा. मिनल बर्वे | सदस्या |

मागील वर्षाच्या मिटिंगमध्ये ॲफिडेव्हिट विषयी चौकशी करावयाची होती. ती डॉ. भारद्वाज यांनी केली असता सरांनी कार्यालयाला असे सूचित केले की विद्यार्थीनींना स्टॅम्प पेपर [२०रु.चे] उपलब्ध होत नसले तरी त्यासाठी कॉलेज जबाबदार नाही त्यांनी ते ॲफिडेव्हिट करून आणणे [स्टॅम्प पेपरवरच] अनिवार्य आहे

F.Y.B.A व F.Y.B.Com च्या विद्यार्थीनींना स्वत: नोडल अधिकारी आणि बर्वे मॅडम यांनी रॅगींग विषयी माहिती देण्याचे ठरविण्यात आले दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी विद्यार्थीनींना ॲन्टी रॅगींगचा बोर्ड, त्यावरील मोबाईल नंबर, पोलिस स्टेशनचा नंबर ही माहिती अवगत करावी असे ठरले

नविन विद्यार्थीनींना कौन्सलिंग विषयी माहिती द्यावी म्हणजे त्या कौन्सलिंगचा फायदा करून घेतील अशी सूचना डॉ. भारद्वाज यांनी केली

प्रा. बर्वे मिनल यांनी सर्वांचे आभार मानले आणि सभा संपल्याचे जाहिर केले

समिती प्रमुख
डॉ. दिपा ढोळकर

प्राचार्य
डॉ. भारद्वाज अश्विनीकुमार

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya,
Jail Road, Nasik Road -22 101

15-16 (2)

ॲन्टि रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात २५ फेब्रुवारी २०१६ रोजी प्राचार्यांच्या कक्षात ॲन्टी रॅगींगची सभा संपन्न झाली

सभेपुढील विषय

1) वर्षभर झालेल्या कमिटीच्या कामकाजाचा आढावा घेणे
2) ॲन्टी रॅगींग विषयीचा अहवाल पुणे विद्यापिठास सादर करणे

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते

1) डॉ अश्विनीकुमार भारद्वाज — प्राचार्य
2) डॉ होळकर दिपा — नोडल अधिकारी
3) डॉ बर्वे मिनल — सदस्य

या वर्षभरात ॲन्टीरॅगींग कमिटीने 4 वेगवेगळ्या ठिकाणी अचानक भेटी दिल्यानंतर त्यांना एकही रॅगींगची केस आढळली नाही तसेच कुणाकडूनही रॅगींग विषयी तक्रार आली नाही असे डॉ होळकर दिपा यांनी सभेस सांगितले

समितीचे सर्वसदस्य नेहमी कार्यरत असतात असे डॉ भारद्वाज सरांनी समिती सदस्यांचे कौतुक केले

ॲन्टी रॅगींग विषयीचा अहवाल सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटीस पाठवून देण्याच्या सुचना मा डॉ भारद्वाज सरांनी केल्या. जेणे करुन विद्यार्थी कल्याण मंडळाच्या हिशेबात अडचण येणार नाही.

पुढील वर्षापासून या समितीमध्ये विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अधिकारी डॉ सुषमा हसबनीस यांचा समावेश करावा. आता युनिव्हर्सिटीने तशा सूचना केल्या आहेत असे सभेस डॉ भारद्वाज यांनी सांगितले

डॉ होळकर दिपा यांनी सर्वांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले

समिती प्रमुख
डॉ दिपा होळकर

प्राचार्य
डॉ ए आर भारद्वाज

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh

Date
Page 16-17 ①

अँन्टि रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात 2-8-2016 रोजी प्राचार्यांच्या कक्षात अँन्टि रॅगींग समितीची सभा भरली

सभेपुढील विषय

1) नविन सदस्यांचे स्वागत
2) नविन विद्यार्थीनींनाअँन्टिरॅगींग विषयी शपथ देणे
3) सदस्यांच्या जबाबदाऱ्या त्यांना सांगणे

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते

| | | |
|---|---|---|
| 1) | डॉ. लिंबारे एस. जे. | प्राचार्य |
| 2) | डॉ. होळकर डी. के. | नोडल अधिकारी |
| 3) | डॉ. बर्वे मिनल | सदस्य |
| 4) | डॉ. हसबनीस सुषमा | सदस्य |

या वर्षी विद्यार्थी कल्याणमंडळाच्या प्रतिनिधी म्हणून डॉ. हसबनीस सुषमा यांचा समावेश करण्यात आला त्यांचे स्वागत प्र.प्राचार्य डॉ. लिंबारे यांनी केले व डॉ. लिंबारे या कमिटीत प्र.प्राचार्य म्हणून उपस्थित राहिले त्यांचे स्वागत नोडल अधिकारी डॉ. दिपा होळकर यांनी केले.

यावर्षी सर्व विद्यार्थीनींना रॅगींग करणार नाही या विषयीची शपथ देण्याचे ठरविण्यात आले हा कार्यक्रम कॉलेजची प्रार्थना झाल्यानंतर घेण्याचे ठरविण्यात आले. तसेच या शैक्षणिक वर्षात रॅगींग विषयी माहिती देण्यासाठी लॉ कॉलेजच्या प्राचार्या वैद्य मॅडमला बोलावण्याचे ठरविले.

सर्व सदस्यांनी काही वेळा अचानकपणे विद्यार्थीनी कक्ष, ऑफ तास असलेल्या ठिकाणी भेटी देऊन रॅगींगची काही तक्रार होते का? याकडे बारकाईने लक्ष द्यावे. कोणतीही तक्रार आल्यास त्वरित प्राचार्यांना माहिती द्यावी असे ठरविण्यात आले.

डॉ. दिपा होळकर यांनी सर्वांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

डॉ. दिपा होळकर

प्रा. प्राचार्य डॉ. लिंबारे एस. जे.
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh

Date
Page 16-12-2

ॲन्टि रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात 27-2-2017 रोजी प्राचार्यांच्या कक्षात ॲन्टी रॅगींग समितीची सभा संपन्न झाली

सभेपुढील विषय

1) वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेणे
2) पुणे युनिव्हरसिटीला ऑनलाइन रिपोर्ट पाठविणे

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते

1) डॉ लिंबोरे एस जे प्राचार्य
2) डॉ होळकर डी.के नोडल अधिकारी
3) डॉ बर्वे एम.पी सदस्य
4) डॉ ~~होळ~~ हसबनीस सुषमा सदस्य
5)

या समितीने वर्षभरात 4 वेळा कॉलेजच्या आवारात लेडीज रूम मध्ये ऑफ तासांना अचानक पाहणी केली असता कोणतीही रॅगींगचा प्रकार होत असल्याचे निदर्शनास आले नाही तसेच कोणतीही रॅगींगची केस दाखल झाली नाही अशी माहिती नोडल अधिकारी डॉ. दिपा होळकर यांनी सभेत दिली.

विदयार्थी कल्याणमंडळाच्या हिशोब तपासणीसाठी आवश्यक असणारा भाग म्हणजे ऑनलाईन रिपोर्ट पाठविणे होय. तो ही पूर्ण करण्यात आल्याची माहिती डॉ. होळकर यांनी सभेस दिली.

विदयार्थीनींच्या कडून मोठ्या प्रमाणात मोबाईलचा वापर वाढत असुन कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडत असल्यास त्या रेकॉर्डिंग करू शकतात किंवा संबंधित कमिटीला तसे सूचित करू शकतात असे डॉ. बर्वे मॅडमने मत व्यक्त केले

डॉ. बर्वे यांनी समिती सदस्यांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

डॉ दिपा होळकर

प्रा. प्राचार्य लिंबोरे एस जे.
PRINCIPAL

# ॲन्टि रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात 23 जुन 2017 रोजी प्राचार्यांच्या कक्षात ॲन्टि रॅगींग कमिटीची मिटिंग घेण्यात आली सभेपुढील विषय

1) नविन विद्यार्थीनींना रॅगींग विषयी माहिती देणे.
2) विद्यार्थीनींना सदस्यांची ओळख करुन देणे.

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते

1) डॉ. लिंबारे एस. जे. प्राचार्य
2) डॉ. होळकर डी. के. नोडल अधिकारी
3) डॉ. बर्वे मिनल
4) डॉ. हसबनीस सुषमा.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी M.A. M.com, F.Y.B.A व F.Y.B.Com अशा नविन प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थीनींना रॅगींग म्हणजे काय? रॅगींग केल्यास काय शिक्षा होऊ शकते. याविषयी नोडल अधिकारी डॉ. दिपा होळकर यांनी माहिती दयावी असे डॉ. लिंबारे यांनी सूचित केले.

विद्यार्थीनींना ॲन्टी रॅगींग कमिटीच्या सदस्यांची ओळख याच वेळी करुन दयावी व त्यांना या मिटिंग मध्ये इतर सदस्यांचे ही मोबाईल नंबर देण्यात यावेत असे ठरविण्यात आले. जेणे करुन विद्यार्थीनी शिक्षकांशी मोबाईल द्वारे संपर्क साधू शकतील असे प्राचार्य डॉ. लिंबारे म्हणाले. सर्व विद्यार्थीनी ॲडमिशनच्या वेळेस ॲन्टि रॅगींग विषयी ॲफिडेव्हिट भरुन देतात की नाही? हे समितीने ॲडमिशन विभागाकडून माहित करुन घ्यावे असे डॉ. लिंबारे सरांनी सांगितले.

ॲन्टि रॅगींग कमिटीने विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म भरण्याची सूचना दयावी असे ही ठरविण्यात आले परन्तु विद्यार्थीनींकडे स्वतःचे कॉम्प्युटर्स नसल्याने किंवा काहि विद्यार्थीनींची आर्थिक परिस्थिती हालाखिच्या

असल्याने त्यांना सायबर कॅफेत जाऊन फॉर्म भरण्यासाठी कमीत कमी 50 ते 100 रुपये लागतील त्यामुळे ते करणे शक्य होईल किंवा नाही हे पुढील काळात कळेल असे डॉ बर्वे म्हणाल्या. तूर्तास सूचना जरी काढली तरी विद्यार्थीनींनी स्टॅम्प पेपरवर ॲफिडेव्हिट करावे की ऑनलाईन फॉर्म भरावा याबाबत संभ्रम निर्माण होईल. त्यामुळे आगोदरचीच व्यवस्था चालू राहू देऊ असे मत डॉ बर्वे यांनी मांडले.

डॉ. हसबनीस यांनी सर्वांचे आभार मानले आणि अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

मा. डॉ. होळकर दिपा.
समिती प्रमुख

मा. प्राचार्य डॉ. सरोजिनी बर्वे
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya,
Jail Road, Nasik Road-422 101

2017-18

ॲन्टि रॅगींग समिती सभा

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात 26 फेब्रुवारी 2018 रोजी. मा. प्राचार्यांच्या कक्षात सभा झाली.

सभेपुढील विषय

1) नविन प्राचार्यांना समिती सदस्यांची ओळख करुन देणे.
2) वर्षभर झालेल्या कामकाजाचा आढावा घेणे

सभेसाठी पुढील सदस्य उपस्थित होते

1) डॉ. लिना पांढरे [प्राचार्या]
2) डॉ. दिपा होळकर — नोडल अधिकारी
3) डॉ. मिनल बर्वे
4) डॉ. सुषमा हसबनीस.

प्राचार्य डॉ. लिना पांढरे या 2 डिसेंबर 2017 रोजी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून रुजू झाल्या त्यांचे या कमिटी मध्ये डॉ. दिपा होळकर यांनी स्वागत केले व कमिटीमधील इतर सदस्यांशी ओळख करुन देण्यात आली.

वर्षभर या कमिटीने अचानकपणे वेगवेगळ्या ठिकाणी अचानक भेटी दिल्या व भेटीनंतर मा. प्राचार्या लिना पांढरे यांना रिपोर्टिंग केले असल्याची माहिती डॉ. होळकर दिपा यांनी सभेस दिली. कोणताही अनुचित प्रकार कुणासही आढळला नाही याबाबत सभेत समाधान व्यक्त करण्यात आले.

या वर्षीचा ॲन्टि रॅगींग कमिटीचा अहवाल सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हरसिटीस पाठविण्यात आल्याची माहिती डॉ. सुषमा हसबनीस यांनी सभेस दिली.

डॉ. दिपा होळकर यांनी सर्वांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

समिती प्रमुख
डॉ होळकर डि.के

डॉ. लिना पांढरे
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Ma[illegible] Vidyalaya